**बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थ्यांची**
**<u>पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.</u>**

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**शासन पूरकपत्र क्रमांक :- संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४७/गृनिप**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १० ऑगस्ट, २०२१.

<u>**वाचा**</u> :- १) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक : विविचा-२००७/ प्र.क्र. ५१ (भाग-१) /गृनिप, दि.३०.०३.२०१६

२) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: विविचा- २०१६/ प्र.क्र.२६१/ गृनिप, दि.२८.०६.२०१७

३) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक : विविचा- २०१६/ प्र.क्र.२६१/गृनिप, दि.२४.०४.२०१८

४) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक : विविचा- २०१६/ प्र.क्र.२६१/गृनिप, दि.०९.०३.२०२१

<u>**प्रस्तावना :-**</u>

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना वाचा येथील क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. वाचा येथील क्र.३ येथील दि.२४.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील बी.डी.डी. चाळीतील भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण प्रकरणाच्या नियमितीकरणाबाबतच्या कालावधीत वाचा येथील क्र.४ येथील दि.०९.०३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदरहू दि.०९.०३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये बी.डी.डी. चाळीतील दि.०१.०१.२०२१ पर्यंत भाडेदारीचे हस्तांतरण (विक्री) केलेली प्रकरणे दि.२४.०४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचना /तरतूदींनुसार नियमित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०७.२०२१ रोजी झालेल्या बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाशी संबंधित उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांबाबत अधिक स्पष्टीकरणात्मक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

वाचा येथील क्र.४ येथील शासन निर्णय, क्र. विविचा-२०१६/प्र.क्र.२६१/गृनिप, दि.०९/०३/२०२१ ला अनुसरुन, बी.डी.डी. चाळीत दि. ०१/०१/२०२१ पर्यंत वास्तव्यास असलेल्या रहिवाशांची पात्रता शासन निर्णय क्र. विविचा- २०१६/ प्र.क्र.२६१/गृनिप, दि.२४.०४.२०१८ अन्वये विहित केलेल्या

विवरणपत्र 'अ' **आणि** 'ब' मधील पुराव्यांच्या आधारे निश्चित केली जाते. सदरहू विवरणपत्र- 'अ' नुसार दि. १३.०६.१९९६ या दिनांकास संबंधीत गाळ्यामध्ये भाडेदारी अस्तित्वात होती, याबाबतचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या विवरणपत्र 'अ' नुसार कागदपत्र / पुरावे सादर करताना बी. डी. डी. चाळीत दि. ०१/०१/२०२१ रोजीपर्यंत वास्तव्यास असलेल्या सर्वच भाडेकरू / रहिवाशांकडे ते रहात असलेल्या गाळ्याची भाडेदारी किंवा तो गाळा दि.१३.०६.१९९६ पूर्वीपासून अस्तित्वात होता, याबाबतचे पुरावे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यांच्याकडे ते वास्तव्यास असलेल्या गाळ्याचे दि. १३.०६.१९९६ पूर्वीचे भाडेदारीचे पुरावे उपलब्ध नाहीत, केवळ या कारणास्तव त्यांना पुनर्विकसीत गाळा वितरणासाठी अपात्र ठरविणे उचित ठरणार नाही. त्यामुळे बी.डी.डी. चाळीत दि.०१.०१.२०२१ रोजीपर्यंत वास्तव्यास असलेले जे भाडेकरु /रहीवाशी दि.२४.०४.२०१८ च्या शासन निर्णयामधील पात्रतेचे निकष पूर्ण करतात मात्र, त्यांच्याकडे ते वास्तव्यास असलेला गाळा दि.१३.०६.१९९६ पूर्वीपासून अस्तित्वात आहे किंवा त्या गाळ्याची भाडेदारी दि.१३.०६.१९९६ पूर्वीपासून अस्तित्वात आहे याबाबतचे पुरावे सादर करु शकणार नाहीत, त्यांना सरसकट अपात्र ठरविण्यात येवू नये. अशा भाडेकरू / रहिवाशांच्या गाळ्याची दि.१३.०६.१९९६ पूर्वीच्या भाडेदारीची खातरजमा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी करावी व तसे प्रमाणित करुन द्यावे. संचालक, बी.डी.डी. चाळी यांच्याकडून बी.डी.डी. चाळींच्या मिळकतीचे संपूर्ण व्यवस्थापनाचे कामकाज पार पाडले जात असल्याने, अशा प्रकरणात त्यांनी दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

२. उपरोक्त परिच्छेद-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी दि.१३/०६/१९९६ पूर्वीची भाडेदारी प्रमाणित करताना, बी.डी.डी. चाळींतील प्रत्येक चाळीमधील मूळ ८० गाळ्यांच्या बदल्यात त्या त्या चाळीतील पुनर्विकसीत गाळ्यांची संख्या /त्या संबंधीत चाळीतील पात्र लाभार्थ्यांची संख्या कोणत्याही परिस्थितीत ८० पेक्षा जास्त होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

३. सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०२१०८१०१८०८२०११०९ असा आहे. हे शासन पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Tulshiram Shete

Digitally signed by Arvind Tulshiram Shete
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d33ed79e4d2d2921d0ca79b9de78ffaa75e5ff9801ced3d15f5ca38bf6aab62, serialNumber=822dcc756ffe36bfe50f258eb6574ffef985ea24e97243442a9c1b3323aaca40, cn=Arvind Tulshiram Shete
Date: 2021.08.10 18:18:42 +05'30'

(अरविंद शेटे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. सभापती / मा. उपसभापती विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई

३) मा. अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. मंत्री व राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. संसद सदस्य / मा. विधान परिषद सदस्य / मा. विधानसभा सदस्य (सर्व)
१२) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
१५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१६) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१७) उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) संचालक, बी.डी.डी. चाळ, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई
१९) उप जिल्हाधिकारी (अति. /निष्का), कुलाबा विभाग /धारावी विभाग, मुंबई शहर, मुंबई
२०) उप जिल्हाधिकारी (अति. /निष्का), वांद्रे -२ विभाग, मुंबई उपनगर, मुंबई
२१) निवडनस्ती (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

xxxxxx